RNI No. MAHBIL/064/13/1/2012
www.dgps.maharashtra.gov.in

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र
# असाधारण भाग एक - नाशिक विभाग

वर्ष - ९, अंक - १ ] बुधवार, सप्टेंबर ३०, २०२० / आश्विन ८, शके १९४२ [ पृष्ठे ०२

## असाधारण क्रमांक १

## प्राधिकृत प्रकाशन

**महानगरपालिका आयुक्त तथा**
**संचालक, नाशिक म्युनिसिपल स्मार्टसिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड यांजकडून**

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम ६० *(२)* अन्वये दिनांक ११ सप्टेंबर २०१९ रोजी प्रसिद्ध झालेल्या जाहीर सूचनेस**

### शुद्धिपत्रक

क्रमांक नाम्युस्मासिडेकॉलि/१५५७/२०२०/*शुद्धिपत्रक*.– (१) प्रारूप नगररचना योजना, नाशिक मखमलाबाद तयार करण्याबाबतचा इरादा नाशिक महानगरपालिकेने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ६० *(१)* अन्वये दिनांक ९ सप्टेंबर २०१९ रोजी जाहीर केला असून तो दिनांक ११ सप्टेंबर २०१९ रोजी महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिद्ध झाला आहे. प्रसिद्ध झालेल्या जाहीर सूचनेत अंतिम भूखंड क्रमांक ४२४, नगररचना योजना क्रमांक २, नाशिक समाविष्ट आहे. तथापि, संचालक, नगररचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी प्रारूप नगररचना योजनेबाबत प्रसिद्धपूर्व सल्ला देताना मंजूर नगररचना योजना क्रमांक २ मधील अंतिम भूखंड क्रमांक ४२४ चे क्षेत्र पुनश्च प्रस्तावित नगररचना योजनेमध्ये समाविष्ट करण्याचे प्रयोजन नसल्याचे नमूद केले असल्यामुळे अंतिम भूखंड क्रमांक ४२४ मंजूर नगररचना योजना क्रमांक २ यांसी क्षेत्र २.९३४० हेक्टर प्रारूप नगररचना योजना, नाशिक मखमलाबादमधून वगळण्यात येत आहे.

(२) प्रारूप नगररचना योजना, नाशिक मखमलाबादबाबत नाशिक महानगरपालिकेने जाहीर केलेल्या इराद्याचे प्रसिद्धीकरण महाराष्ट्र शासन राजपत्रात दिनांक ११ सप्टेंबर २०१९ रोजी झाले आहे. सदर प्रसिद्ध झालेल्या जाहीर सूचनेत प्रारूप नगररचना योजनेमध्ये समाविष्ट जमिनींचा व योजनेच्या चतु:सीमांचा तपशील दिला आहे. त्यानुसार प्रारूप योजनेतील एकूण क्षेत्र ३०४.७३ हेक्टर म्हणजेच ७५३ एकर असल्याचे नमूद आहे.

प्रत्यक्ष संपूर्ण योजना क्षेत्राची मोजणी जिल्हा निरीक्षक, भूमि अभिलेख कार्यालयाकडून केल्यानंतर तसेच पोट-हिस्सा मोजणी नकाशे प्राप्त करून सर्वेक्षण केल्यानंतर संपूर्ण योजनेखालील क्षेत्र ३०४.७३ हेक्टरऐवजी वाढून ३०६.६७ हेक्टर झाल्याचे आढळून आले. सदर दुरुस्त क्षेत्राचा तपशील विचारात घेऊन प्रारूप योजना तांत्रिक छाननीसाठी संचालक, नगररचना कार्यालयास क्षेत्रातील तफावतीचा खुलासा देऊन सादर करण्यात आला होता.

संचालक, नगररचना यांनी त्यांचे छाननी अहवालात मुद्दा क्रमांक (१) मध्ये नमूद केल्यानुसार मंजूर नगररचना योजना क्रमांक २, नाशिक मधील अंतिम भूखंड क्रमांक ४२४ सदर प्रारूप योजनेत पुन्हा समाविष्ट करण्याचे प्रयोजन नसल्याचे नमूद केल्यामुळे सदर अंतिम भूखंडाचे क्षेत्र २.९३४० हेक्टर प्रारूप योजनेतून कमी होऊन प्रारूप योजनेचे एकूण क्षेत्र (३०६.६७ – २.९३४०) ३०३.७४ हेक्टर होईल.

**कैलास जाधव,**
भा. प्र. से.

आयुक्त, नाशिक महानगरपालिका, नाशिक तथा
संचालक, नाशिक म्युनिसिपल स्मार्टसिटी
डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड, नाशिक.

नाशिक, १९ सप्टेंबर २०२०.

---

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT YERAWADA PRISON PRESS, PRISON COMPOUND, YERAWADA, PUNE-411 006 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI – 400 004.

EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.